**शासकीय कर्मचाऱ्याने सेवानिवृत्तीच्या वेळी स्थायित्व प्रमाणपत्र धारण केलेले असण्यासंबंधीची अट .........**

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांकः सेनिवे १००७/६२ /सेवा-४
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. दिनांकः ४ जानेवारी २००८.

**वाचा :-** शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक:सेनिवे १००१/१३८/सेवा-४, दिनांक २ जून २००३

## निर्णय

**प्रस्तावना :-**

शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांकःसेनिवे १००१/१३८/सेवा-४, दिनांक २ जून २००३ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम ३० मधील, "सेवानिवृत्तीच्या वेळी शासकीय कर्मचाऱ्याने शासकीय सेवेतील एखादे स्थायी पद कायमपणे धारण केलेले असले पाहिजे अथवा निलंबित धारणाधिकार किंवा स्थायीत्व प्रमाणपत्र धारण केलेले असले पहिजे."- ही तरतूद वगळण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि या निर्णयाचा फेरविचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**निर्णय :-**

२. शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक:सेनिवे १००१/१३८/सेवा-४, दिनांक २ जून २००३ अन्वये घेतलेला निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे दिनांक २ जून २००३ पासून रद्द करण्यात येत आहे.

३. या निर्णयाच्या परिणामी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ नियम ३० मधील पूर्वीची तरतूद म्हणजे "सेवानिवृत्तीच्या वेळी शासकीय कर्मचाऱ्याने शासकीय सेवेतील एखादे स्थायी पद कायमपणे धारण केलेले असले पाहिजे अथवा निलंबित धारणाधिकार किंवा स्थायीत्व प्रमाणपत्र धारण केलेले असले पहिजे." पूर्ववत लागू राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००८०१०८१२३११०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

उषा प्र. महाजन
शासनाच्या उप सचिव

प्रति,

महालेखापाल (लेखाव अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५प्रती),
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष